प्रकरणे २ रे

१३ व्या शतकातील लेखनाच्या प्रेरणा व

चरित्रात्मक लेखनाचे स्वरुप

पृष्ठ कमांक ०२३ - ०३९

## १) १३ व्या शतकातील लेखनाच्या प्रेरणा व चरित्रात्मक लेखनाचे स्वरुप:-

१३ वे शतक हे प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मानावे लागेल कारण हया कालखंडात पद्य व गद्य स्वरुपातील वाङ्:मय मराठीत लिहिले जाऊ लागले. या काळात वैदिक ग्रंथ रामायण, महाभारत, भागवत, पुराणे इत्यादींचे श्रध्दापूर्वक अध्ययन करुन त्यातून उदंड प्रेरणा मिळविली गेली. पूर्वकालीन वाङ्:मय परंपरेशी स्वत:चे नाते प्रस्थापित झाले विचारांचे प्रौढत्व वृत्तीचे गांभीर्य, निरुपणाचा उत्साह, रसात्मकता, अर्थघनता, आत्मविश्वास आणि पृथगात्मता इत्यादींचा प्रत्यय या काळखंडातील वाङ्:मय कृती दिल्या खेरीज राहत नाहीत.

या काळखंडांचे आणखी एक वैशिष्ठ म्हणजे आजपर्यंत संस्कृतमध्ये बंदीस्त असलेले ज्ञान सर्वसामान्यांना समजेल, रुचेल व पचेल अशा भाषेतून लिहिले गेले. सर्वसामान्यांच्याच भाषेतून लिहिले असल्यामुळे सर्वांना ज्ञानाची कवाडे उघडी झाली व आध्यात्म ज्ञान सर्वसामान्यांपर्यत जावून पोहचले. ज्ञानेश्वर, मुकुंदराज, माहिमभट्ट इत्यादी ग्रंथ लेखकांनी जे ग्रंथ लेखन केले त्यातून समाजाच्या सर्व स्तरातील सुजन वृत्तीच्या माणसांना केवळ ग्रंथ वाचनाचीच गोडी निर्माण झाली. असे नव्हेतर आपल्या भावनांना अभिव्यक्ती शोधण्याचीही प्रेरणा झाली. लेखक व श्रोता हा परस्पर संबंध तेराव्या शतकाचे एक वैशिष्ठ म्हणावे लागेल. गद्य व पद्य माध्यमातील चरित्रात्मक लेखनाच्या प्रदिर्घ परंपरा हया काळात जन्माला आल्या. नामदेवांनी ज्ञानेश्वर चरित्राच्या स्वरुपात अभंगात्मक, चरित्रात्मक लेखनाचे सुतोवाच केले. हया काळात संस्कृत चरित्र काव्यांच्या अनुकरणातून लक्षणीय अशी चरित्र काव्यांची मराठी रुपेही निर्माण झाली.

### अ)धार्मिक परिस्थितीची प्रतिकुलता:- लेखनाच्या प्रेरणा:-

Repetition (page 20 I para)

ग्रंथबध्द असलेले ज्ञान सोपेपणाने व आत्मप्रत्ययाने सांगणारा ग्रंथ तेराव्या शतकातील समाजाला हवा होता. अध्यात्मीक उन्नतीची अस्मीता निर्माण करणारा

सामान्याना उमजेल अशा भाषेत बोलणारा पंथही तेराव्या शतकातील सामाजीक गरज होती. यादवांची सत्ता मोडकळीस आलेली होती. पराक्रमांचे तेज मंदावले होते. राजकारण आणि समाजकारणातील सुस्थिरता संपुष्टात आली होती. व्यक्तिगत जीवन अत्यंत असुरक्षित होते. धर्म जीवनाला कळा नव्हती. रुढी ग्रस्तता, कर्मकांड अनेक देवतांचे पुजाप्रकार, सकाम भक्ती, ढोंग, दंभ हया विविध कारणाने धर्म जीवनातील चैतन्यच जाणवेनासे झाले होते. अशा परिस्थितीत ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर याच्यासारख्या विभूतीना समाजाने परमेश्वराचे अवतार मानले.

ब) १३ व्या शतकातील चरित्रात्मक लेखनाचे स्वरुप:-

महानुभाव पंथातील लेखनाचा एक घाट ठरविला व लीळाचरित्र लेखनाने एक संकेत निर्माण केला.

लिळाचरित्राची काही वैशिष्ठे आहेत. हे चरित्र स्मृतींच्या स्वरुपात लिहले असल्यामुळे त्यात एक प्रकारचा अंगभूत जिव्हाळा अनुभवास येतो. चंक्रधराविषयीच्या निष्ठेने प्रत्येक आठवण लिहिली गेली आहे. प्रत्येक भक्ताने काही स्मृती जिव्हाळयाने जतन केले आहेत. आणि भक्तीच्या उमाळयाने आणि जिव्हाळयाने हा ग्रंथ वाचला जात असला पाहिजे.

[१]हया स्मृती कथन रुपाने लिहिलेल्या असल्यामुळे त्या सांगणा-या व्यक्तीच्या मानातील भावनात्मकतेचे रंग हया स्मृतींना लाभलेले आहे. स्मृतींच्या केंद्रस्थानी चक्रधर स्वामी आहेत. एकाच व्यक्तीच्या जीवनाचे विविध पैलू निरनिराळया व्यक्तीच्या डोळयांनी पाहिले गेले असल्यामुळे त्याला विविधता नाविण्य लाभलेले आहे. व्यक्ती विविधता असल्यामुळे त्यांच्या निरीक्षणामध्येही विविधता दिसून येते. यामधील काही भक्त त्यांच्या सान्निध्यात राहीलेले, काही स्त्रीया काही चंक्रधरांचा केवळ उपदेश घेतलेले, निरनिराळया जातीचे, व्यवसायाचे व वयाचे असे लोक आहेत. त्यामुळे प्रत्येकाची कथन पध्दती वेगळी असल्यामुळे कथनात बहुरंगीपणा आलेला आहे. भावनात्मकतेने ओथंबलेले लेखन कमी अधिक प्रमाणात दिसून येते.

अहंकार अहंभावाचा भावना मात्र कथन कारांच्यात दिसून येत नाही. कारण काठेही स्मृती सांगणा-याचे नाव दिसत नाही. कथनाच्या ओघात आठवण चक्रधरांच्या भोवती गुंफण्याच्या कौशल्यातच ते प्रकट झालेले दिसते. कथनामध्ये मनोवेधक सरलत्व दिसून येते. कृत्रीमपणा, अवघडलेपणा, खोटेपणा हया दोषापासून हे कथन अलिप्त राहिलेले दिसून येते. आढवणी सांगणा-या व्यक्ती स्वत:चे देहभान विसरुन भाबडेपणाने कथनांत एकरुप झालेल्या दिसतात. रेखीवपणा, उद्‌गारातील नाटय, वस्तूनिष्ठ तपशिल, सुचक हालचालीतून व्यक्त झालेले विविध ताणबाण, व्यक्ती गोचरता हयामुळे लिळाचरित्राचा आशय संमृध्द झाला आहे.

२ जसेच्या तसे प्रकटीकरण- जे घडले त्यात काही बदल न करता प्रामाणिपणे जसेच्या तसे लिहिल्यामुळे वृत्तीचा साधेपणा, आकर्षकपणे प्रत्ययाला येतो. परमेश्वरी अवताराचे वर्णन अत्मप्रत्ययाने केलेले आहे. आठवणी कथनांध्ये कल्पकतेचा नटवेपणा नाही. अष्टांग भक्तीची वर्णने नाहीत. प्रसंग प्रतीकरुप बनविलेले नाहीत. प्रसंग आणि तत्वज्ञानाची सांगड कृत्रिमतेने घातलेले नाहीत.

चंकधरांच्या स्मृती सुटया सुटया असल्यातरी त्यांच्यामध्ये एकसमान केंद्रीत्वाचा धागा आहे. बांधणी सैलसर, शिथिल आहे. लहान लहान कवडशामधून देखील व्यक्तीमत्व रेखीवपणे प्रकट होवू शकले आहे. आठवणी ताज्या व टवटवीत ठेवण्याचे काम माहिम भट्टांनी लेखनांत टिकवून ठेवले आहे. त्यांनीजरी लेखन प्रथम पुरुषी पध्दतीने केलेले नसले तरी चरित्र लेखक म्हणून एक लेखन संस्कारमात्र निर्माण केला आहे. त्यांची चकधाराविषयीची भाषा मात्र आदरयुक्त आहे. त्यांनी चकधरांच्या उद्‌गारातील धाटणी, नेमकेपणा, व्यक्त केला आहे. समर्थनाचा मोह मात्र टाळला आहे. ईश्वर सेवेच्याच भावनेने त्यांनी लेखन केलेले आहे. कथनांचा ओघ प्रत्येक आठवणी बरोबर खंडीत झाला असला तरी हया चरित्रातून चकधरांच्या व्यक्तिजीवनाची एकात्म आकृती जाणवल्या खेरीज राहत नाही. एकात्म परिणाम सुचक असा प्रत्यय हे चरित्र निर्माण करते.

## २) नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्राची प्रेरणा व स्वरुप:-

वारकरी संप्रदायाचा आद्य चरित्रग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरचरित्र होय. हा आद्य -पद्यचरित्रग्रंथ लिहिण्याचा मान नामदेवांनी मिळविला आहे. त्यांच्या निर्मितीच्या प्रकियेतून नामदेवांवर ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा आणि व्यक्तिमत्वाचा विशेष प्रभाव दिसून येतो. ज्ञानेश्वरांच्या लौकिक जीवनापेक्षा त्यांच्या चिंतनिकेला विशेष महत्व दिले आहे. नामदेवांनी ज्ञानेश्वरांना जाणून घेण्यासाठी त्यांचे भक्तियोगाचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी ज्ञानेश्वर चरित्र लिहिले.

[३]आद्य चरित्रकार या नात्याने गद्य परंपरेत माहिमभट्टांचे, तर पद्यपरंपरेत नामदेवांचे नाव घेतले जाते. उभयतांच्या चरित्रलेखनाच्या प्रेरणेमध्ये विलक्षण साम्य आढळते. प्राचीन चरित्रात्मक लेखनाला भक्तीमार्गातील तत्वे प्रेरक ठरले आहे. नामस्मरण, वंदन, अर्चन, कीर्तन, ममन, ध्यान व आत्मनिवेदन इत्यादी भक्तीची अंगे चरित्रात्मक लेखनाच्या संदर्भात उपकारक ठरली आहेत. भक्तांच्या मनातील परमेश्वरासंबंधीच्या भक्तिभावनेने तो परमेश्वराचे गुण संकीर्तन, नामस्मरण, रुप वा मुर्तीवर्णन, तसेच चरित्रकथन करण्यास प्रवृत्त होतो. सर्वभक्ती पंथामधील धारणा परमेश्वर हा अंश रुपाने सर्वत्र व्यापून राहणारा असल्याने त्याला सर्वत्र पाहता येते, अनुभवता येते, ही धारणा सर्व भक्तिपंथामध्ये आहे. चक्रधरासारखी व्यक्ती तर परमेश्वरी अवताराच्या स्वरुपात सर्वत्र वावरत असते. ज्ञानेश्वरादी संतांनाही परमेश्वराचे अवतारीत्व देण्यात येते. प्राचीन चरित्रात्मक लेखनात परमेश्वरी दैवतालाही मानुषित्व बहाल करण्यात आले आहे.

### भक्ती हया वृत्तीविशेषाचे स्वरुप:-

[४]परमेश्वराचे स्वरुप जाणण्यासाठी भक्तीही एक वैशिष्ठपूर्ण वृत्ती Attitude आहे. तन्मयतेने विचार करण्याची एक पध्दती आहे. भक्तीने युक्त असलेली व्यक्ती तिच्याशी तन्मय होवून, तिचा ध्यास घेऊन जाणून घेता येतो. या व्यक्तीच्या तन्मयी वृत्तीमुळे व्यक्तीचे रुप,बोलणे, चालणे, जीवन, विचार, तत्वज्ञान या सा-यांचा एक संघ प्रत्यय घेता येतो. समग्र व सातत्याने केलेल्या चिंतनाने व्यक्ती विषयीचे हृद्गत जाणता येते. ते व्यक्त करता येते. . असे हया

भक्ती वृत्तीचे वर्णन करता येईल. महानुभव व वारकरी संप्रदायांच्या महंत-संतामध्ये ही वृत्ती आढळते. ही वृत्ती आत्मविसर साधते नि आत्ममग्न राहते.

ती व्यक्ती अन्य व्यक्तीच्या सर्वात्मक व्यक्तीमत्वाचे चित्र मनोमन जाणू शकते. प्राचीन संत वृत्तीचे चरित्रलेखन हे भक्तीच्या समज वृत्तीचे होते. आणि याच वृत्तीने सर्व प्राचीन चरित्रात्मक लेखन केले गेले आहे.

चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यानी या भक्तीची सुत्रे सांगितली आहेत. त्या सुत्रातून "चरित्र" हा शब्दही सहजपणे उपयोजला आहे. म्हणून भक्ती हया वृत्तीचा चरित्रात्मक लेखनाला बराच उपयोग झाला आहे असे म्हणता येते.

ज्ञानदेव कालीन महाराष्ट्रः-

ज्ञानदेवांच्या काळी मुसलमानांचा शिरकाव दक्षिणेत झालेला नव्हता वेरुळला त्या काळी हिंदू राजा राज्य करीत होता. ज्ञानेश्वरीची रचना स्वराज्यात झाली. महाराष्ट्रावर पूढे लवकरच कोसळणारे परकीय अमलाचे व धर्म छळांचे संकट तेव्हा कोणाच्या हो-यातही नव्हते. त्यावेळी सध्याप्रमाणे प्रवासाच्या सोयी नव्हत्या, तिर्थयात्रेखेरीज दुस-या निमित्याने आपले लोक बाहेर सहसा जात नसत. तिर्थयात्रेला गेलेल्या लोकातील बरेचसे परत येत नसत. शिवाय उत्तर हिंदूस्थानात त्यावेळी नुकताच कोठे-कोठे सुरु झालेला यवमी अंमल राजधानीच्या किंवा तशासारख्या मोठया शहरात जसा जाणावे तसा खेडयापाडयातून जाणवत नव्हता. या आणि अशा अनेक कारणामुळे तेराव्या शतकात महाराष्ट्रात मुसलमानी अमलाचा वास सुध्दा कोणाला आला नसल्यास त्यात नवल नाही. सध्या मोगलाईत दौलताबाद किल्ला आहे. हा औरंगाबादेहून वेरुळात जाताना वाटेत लागतो. यांचा ठिकाणाला पूर्वी देवगिरी म्हणत. येथे जाधव किंवा यादव घराण्यातील राजे राज्य करीत.

या राज्यांचा मुळ पुरुष भिल्लम याने शके ११०९ पासून १११४ पर्यंत देवगिरीला राज्य वैभव भोगिले. भिल्लमपासून पाचवा पुरुष रामदेवराव याने शके

११९३ ते १२३१ पर्यंत म्हणजे इसवी सन १२७१ पासून ते १३०९ पर्यंत म्हणजे सुमारे ३८ वर्षे देवगिरीला राज्य केले. रामदेव रावाचा आजा सिंघण याचीही कारकिर्द ३७ वर्षाची झाली. या रामदेव रावाच्या राज्यात ज्ञानदेव जन्माला आले. त्यांच्याच राजवटीत त्यांनी ग्रंथ रचना केली. समाधी घेतली.

म्हणजे यादव किंवा जाधव यांच्या कारकिर्दीत मराठी वाङ्‌मयाने फार पुढे पाऊल टाकले. ज्ञानेश्वरीमध्ये रामदेव रावांचा मोठा गौरवपर उल्लेख आहे.

"तेथ यदुवंशबिलासु । जो सकळकळांनिवासु ।

न्यायाने पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ।

ज्ञानदेवासारख्या निस्पृह ज्ञानी पुरुषाने या राजाचा असा गौरवपर उल्लेख करावा यावरुन रामदेवराव हा चांगला राजा होवून गेला हे उघड. तो सकळकळानिवास होता. न्यायाने वागणारा होता. त्याच्या राज्यात न्यायामुळे समाधान व विद्याकलांचे कौतूक होते यामुळे ज्ञानदेवासारख्या तत्वज्ञाला ज्ञानेश्वरी सारखे "देशीकार लेणे" निर्माण करता आले. विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी अमृतानुभव यासारखे ग्रंथ ज्यांच्या घराण्यात निर्माण झाले त्या यादव, जाधव घराण्याचे देवगिरीच्या राजांचे महाराष्ट्राने कृतज्ञपूर्वक स्मरण ठेवले पाहिजे यात शंका नाही.

रामदेवरावाच्या कारकीर्दीत महाराष्ट्रात-स्वराज्य पूर्ण तेजाने तळपळत होते. असे म्हणण्यास हरकत नाही. विद्यांना आणि कलांना त्यावेळी मोठा बहर आलेला होता. जाधव घराण्याच्या या उत्तरार्धात महाराष्ट्रात वाङ्‌मयाचे पाऊल पूढे सरकले. आपल्या देशात स्वराज्य असणे आपल्या राजसत्तेचा सर्वत्र वचक असणे या गोष्टी मनाच्या प्रसन्नतेला सहाय्यकारक होते.

<u>लेखन पध्दती:-</u>

यावेळी हिंदूस्थान भर कृष्ण भक्ती प्रामुख्याने पसरत होती. महानुभाव पंथ मुख्यत्वेकरुन कृष्ण भक्तीचा पंथ आहे. वैष्णव धर्माचे, पंथाचे प्राबल्य सर्वत्र पसरत होते. भक्तीमार्ग हा या पंथांचा विशेष पंढरपूरच्या वैष्णवाने, वारक-यांनी ज्ञानदेवांना आपले परात्पर गुरु म्हणून मान्य केले. जाधवांच्या राजवटीत कृष्ण भक्तीचे महात्म्य विशेष वाढून योगमार्ग मागे पडला.

## १. संत नामदेवांचे व्यक्तिमत्वः-

मराठी भाषेमध्ये आत्मचरित्रात्मक लेखन फार थोडयांनी लिहिले त्यात नामदेवांचा कालानुक्रमाने आणि गुणानुक्रमानेही पहिला क्रमांक लागतो. नामदेवांचे व्यक्तिचित्र त्यांच्या अभंगातून शोधून काढणे ही मोठी मनोरंजक आणि उद्‌बोधक गोष्ट आहे. वाङ्‌मयान व्यक्ति लौकिक व्यक्ति एकढीच सत्य व महत्वाची असते. आपल्या काव्यातून नामदेवांनी केलेल्या आत्मनिदेवनाच्या आधारे त्याचे लौकिक व्यक्तिमत्व रसिकांच्या मनःचक्षुंसमोर उभे रहाते. मनुष्याच्या आचारातून त्यांचे बव्हंशी स्वभावदर्शन घडते. व स्वभाव हा व्यक्तिमत्वाचा महात्वाचा भाग ठरतो.

प्रेमळपणा, ऋजूता, बहूश्रुतता, भ्रमणशीलता, वाक्‌पटव इत्यादी स्वभाव वैशिष्ठयांनी नामदेवांचे व्यक्तिमत्व मंडीत झाले आहे. आणि ही वैशिष्ठये विविध गुणोपगुणांच्या सुक्ष्म छाटांनी उजळून निघाली आहेत. नामदेवांचा प्रेमाचा जिव्हाळा अलौकिक असल्याचा निर्वाळा संतसज्जनांनी गोणाईस दिला आहे. त्याच 'संतांच्या चरणी द्यावे अलिंगन । जीवे निंबलोण उतरावे ॥ असे नामदेवांच्या मनीचे आर्त आहे. 'तीर्थवळी' च्या समयी ज्ञानेश्वर नामदेवांस 'अव्दैत आत्मया प्रेममूर्ती' असे संबोधतात व 'प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या ह्रदयी आला असून 'पंढरीरायाचा तूं प्रेम-भांडारी' आहेस. अशी नामदेवांची प्रशस्ती ते करतात. ज्ञानेश्वर समाधि घेण्यास सिध्द झाले तेंव्हाहि 'प्रेमाचा पुतळा नामदेव' असाच त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख ज्ञानेश्वरांनी केलेला आहे.

कारंजातून थुईथुई उडणा-या शीतल जलबिंदूप्रमाणे स्वतःच्या अंतःकरणातील प्रेमळपणाच्या तुषारांनी नामदेवांची अभंगवाणी सुस्नात झाली आहे. साधुसंतजन आपले मायबाप आहेत ते अंतरीचे जीवप्राण आहेत, असे नामदेव सांगतात. या हरिदासांना अकल्प आयुष्य व्हावे, त्यांना कधीहि कल्पनेची बाधा होऊ नये, ही संत मंडळी सुखी असावीत, या भविक विष्णुदासांना अहंकाराचा वारा लागू नये व ज्यांच्या मुखी पांडुरंगनामाचे निधान आहे, त्यांचे कल्याण असावे. हे नामदेवांनी केलेले अभिष्ठचिंतन ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचे स्मरण करुन देणारे आहे.

नामदेवांच्या या प्रेमळपणास हळुवारपणाची जोड आहे. त्यांचे मन अतिशय संवेदनक्षम व हळवे आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधि सोहळयाचे वर्णन करताना नामदेवांचा कंठ गहिवरुन येतो. ज्ञानाचे ते प्रत्यक्षबिंब पुन्हा दिसणार नाही, याचे त्यांना अपार दु:ख होते. विठ्ठलाच्या भेटीसाठी तळमळणारे नामदेवांचे मन असेच करुणार्द्र आहे. 'नेत्र माझे रोडले, आठवे माहेर । कैभेटेन निरंतर बाईयांनो ।' असा पुकारा या मनाने केला असून 'त्यासि आठविता हृदय वो फुटे ' असा टाहो त्याने फोडला आहे. आनंदी वृत्ती व प्रेमळ भाव हाच नामदेवांच्या स्वभावाचा खरा स्थायीभाव आहे.

[६]ऋजुता हे नामदेवांचे स्वभाववैशिष्ठय उल्लेखनीय आहे. त्यांची वृत्ती साधी, सरळ, निरागस व विनम्र आहे. नामदेवांचे अभंग म्हणजे त्यांच्या हळुवार अंत:करणाची स्पंदने आहेत. आकाशात मेघाला पाहून मोराने आनंदाने नर्तन करावे. त्याप्रमाणे विठ्ठलास पाहून 'हांसे, नाचे, बोले, स्फुंदतु, डुलतु । गातु अहर्निशी नाम तुझे ॥' अशी नामदेवांची स्थिती आहे.

नामदेवांचा भर बुध्दिपेक्षा भावनेवर आहे. नामदेव 'वाक्‌चतुर' होते. त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांतून त्यांचे वाक्‌चातुर्य प्रतीत होते. 'तिर्थावळी' प्रकरणातील ज्ञानेश्वर-नामदेव संवादातून त्यांचे संभाषण कौशल्य ध्यानात येते. नामदेवांनी आपल्या शांत व समतोल वृत्तीने व वाक्‌चातुर्याने लोकांची मने तर जिंकलीच, पण त्याबरोबरच त्यांच्या वाक्‌यज्ञाने विश्वात्मक देवही संतुष्ठ झाला.

**भ्रमणशिलता:-**

नामदेव भ्रमणशील होते. त्यांचे उभे आयुष्य हिंडण्याफिरण्यात गेले. नामदेवांचे मूळगांव नरसी-बामणी जन्म पंढरीस झाला.[७] कल्याणीस त्यांचे आजोळ. 'नामयाचा जिव्हार' असलेला 'सखा विरळा ज्ञानेश्वर' आळंदीस रहात होता. आळंदीस नामदेवांचे जाणे-येणे होई. नरसीहून रोज औढया नागनाथास नामदेव जाऊन येत असत. ज्ञानेश्वरांबरोबर नामदेवांनी एकदा तीर्थयात्रा केली. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर नामदेव पुन्हा पंधरा-वीस वर्षे पंजाबांतील धुमान येथे जाऊन राहिले.

**नामदेवांची कुटुंबशीलता :-**

पंढरपूरला विठ्ठल मंदिराजवळ नामदेवांचे घर होते. चौदा माणसांचे एकत्र कुटुंब होते. नामदेवांचे आई-वडील, पत्नी, चार मुलगे, चौघी सुना, नामदेवांची बहीण व दासी जनी असे अनेक माणसांनी गजबजलेले हे एकत्र कुटुंब होते. प्रपंच त्यांच्यावर लादला होता. गृहकर्तव्याकडे त्यांचे लक्ष नसे. त्यांच्या परमार्थसाधनामध्ये कौटुंबिक विरोध होता. तरीही निदास्तुति समान मानून प्रपंच व परमार्थ यांतील समतोल ते साधू शकले. "खरा प्रपंच व परमार्थ यात विरोध नाही, इतकेच नव्हे तर एक सोडून दुस-याचे साधन करणे हा संपूर्ण धर्म नव्हे व मनुष्याचे आखिल कर्तव्य नव्हे. तसेच एकानेच ईश्वर प्राप्ती पूरी होणार नाही. म्हणून देहाचे साधन केले पाहिजे. व असे केल्यानेच दोन्हीच्या पूर्ण सुखाचा मनुष्यास अनुभव येईल, या भांडारकरांच्या विचाराचा वस्तूपाठ नामदेवांच्या जीवनात आढळतो. कुटुंबशिलता व परामार्थपरता यांचा अपूर्व समन्वय त्यानी आपल्या आचरणाने साधला आहे. 'संसारी असावे असोनी नसावे ।' असा नामदेवांचा अनासक्त गृहकर्मयोग आहे. 'नामयामे संसारा जिंकिले।' असे साफल्याचे समाधान येथे आहे.

**नामदेवांचे पारमार्थीक व्यक्तिमत्व:-**

अंत:करणाचे 'उभड'- अध्यात्म्य जीवनांतील विविध अनुभूतीचा अविष्कार करीत असताना नामदेवांचे स्वत:चे व्यक्तिमत्व आपोआपच प्रकट झाले आहे.[८] त्यांची काव्यरचना विलक्षण आत्मनिष्ठ असल्यामुळे त्यांच्या पारमार्थिक व्यक्तिमत्वाचे यथार्थ दर्शन होते. त्यांनी आपल्या कवित्वांत अंतरीचे उमाळे शब्दांकित केले असून, 'चिंतेचा ओणवा लागला चहूंकडा' अशा तीव्र मनोव्यस्थांचे दर्शन त्यात घडते. नामदेवांची मनोवृत्ती आत्माभिमुख व कामालीची संवेदनक्षम असल्यामुळे त्यांचे अभंग म्हणजे अंत:करणाचे 'उभड' त्यांची कविता हिच त्याची आत्मकथा आहे. उत्कठा, उत्कठता, अधिरता, आर्तता, अनुताप इत्यादी भावोर्मीच्या प्रवाहात स्वत: नामदेवच त्या त्या वेळी सापडले आहे. त्यामुळे त्रुटीत, स्वतंत्र व स्वयंमपूर्ण अशा भावनेचे अविष्करण एकेका अभंगात

झाले आहे. या अभंगात्मक भाव चित्रांच्या अनुबंधातून त्यांचा आत्मीक विकासाचा पट पहावयास मिळतो.

<u>**आत्मविकासाच्या अवस्था:-**</u>

नामदेवांच्या पारमार्थिक जीवनचरित्रांतून त्यांच्या आत्मीक विकासाच्या सहा अवस्था आढळून येतात.

१) **बध्दावस्था:-** येथे सर्पाने गुडाळलेल्या चंदनाच्या झाडाप्रमाणे अहंकाराने ग्रासलेले मन प्रतीत होते.

२) **मुमुक्षूदशा:-** येथे अनुतापाने उजळलेले त्यांचे मन परमार्थ साधनांची जुळवाजुळव करताना दिसून येते.

३) **साधकदशा:-** या अवस्थेत नामचिंतनाचा दृढनिश्चय करुन व चित्तवृत्तीचे स्थैर्य साधुन भक्तीचे दृढीकरण करणारे नामदेवांचे व्यक्तिमत्व आपणास प्रभावित करते.

४) **वंचितदशा:-** प्रयत्न विफल होत आहेत या शंकेने त्यांच्या मनात वैफल्स ग्रासून टाकते. प्रपंच तर हातचा निसटला आणि परमार्थनिही कांचन मृगाची भुलावण आरंभिली. या दयनीय दशेतून अनुभवास येणारी निराशा त्यांचे चित्त पोखरते.

५) **सिध्दावस्था:-** पण अज्ञानाच्या अंधारात तडफडणा-या त्यांच्या जिवाची ही अंधारी रात्र लवकरच उजळते आणि परमेश्वर प्राप्तीचा अरुणोदय होवून साधकाला सिध्दावस्था प्राप्त होते.

६) जीवनमुक्तावस्था:-

या अवस्थेमध्ये हे सिध्द पुरुष 'उरलो उपकारापुरता' अशी तुकोबाप्रमाणे स्वत:ची भूमिका मानतात. 'दिव्य अंतीम सत्यांचा अंत:प्ररणेने होणारा साक्षात्कार' असे या अवस्थेचे स्वरुप असते. अज्ञानाचा गडद अंधार दूर होऊन परतत्वाच्या प्रकाशाने साधक पुनित होतो.

समर्थाच्या शब्दात सांगायचे म्हणजे डोंगरी राहणारा हा दास देवाची यात्रा निर्मम वृत्तीन पाहतो. सिध्दावस्थेच्या पलीकडे गेलेला हा पारमार्थिक सामरस्याच्या

अभिषेकाने सुस्नात होतो । विचरे विश्व होऊनि विश्वामाजी । नामदेव सांगतात,'कासवीची पिले पोशिली कृपेने । तैसा पै आत्मज्ञाने सुखी झालो ।

**साक्षात्कार पथावरील नामदेव:-**

बध्दावस्थेपासून जीवनमुक्तावस्थेपर्यतच्या विविध अवस्थान्तरातून नामदेवांनी आपल्या पारमार्थिक विकासाची वाटचाल केली.[१] नामदेवांच्या अभंगवाणीत उच्चप्रतिच्या साक्षात्कारांचे उल्लेख विपूल मिळतात. त्यांना घडलेला साक्षात्कार हा पाय-या पाय-यांनी हळूहळू वाढत गेला आहे. साक्षात्कार ही प्रवाही प्रकिया आहे. घटना नाही, उक्तीची प्रचिती नामदेवांच्या पारमार्थिक चरित्रात प्रकर्शाने येते.

**अभंगवाटीकेतील आत्मानंद पुष्पे:-**

आत्मानंदामध्ये आत्मा स्वत:च्याच वेगळेपणाने आनंदमय अनुभव घेतो. मग त्या आनंदाने अहंप्रत्यय विरुन जावून केवलाव्दैताचा अनुभव येतो. नामदेवांच्या ही पारमार्थिक जीवनात आत्मानंदाच्या या अपूर्व अवस्थेचे दर्शन घडते. त्यांनी साधना केल्यावर त्यांना त्रिभुवन तदाकार दिसू लागले. ते अखंड उन्मनी अवस्थेत गेले. देहाचे चालक जे मन तेच हारपून गेले. 'वेणूवाहुनि चित्त दुहिले । रुपदाऊनि मज मने मोहियेले ।' असा दिव्यानुभव त्यांना आला. ते म्हणतात,"मीच माझा देव आहे. मीच माझा भक्त आहे, मी सदाच मुक्त होतो, आतामात्र विठ्ठल कृपेने हरपलेले निजसूख सापडले." आत्म साक्षात्कारानंतरच्या आत्मस्थितीचे वर्णन करताना नामदेव सांगतात. ती सुंदर सावळी मुर्ती मी ह्रदयात धरुन ठेवली. त्यामुळे मला अखंड आत्मानंदाचा अनुभव आला माझा देहभाव हरपला, मन स्वरुपी गुतले. म्हणून ते पांगुळले. प्रपंचाविषयी विचारच उरला नाही. व्दैत भावना नष्ट झाली, आत्मरुपाच्या दर्शनाने नेत्र तेजस्वी झाले. जन्म मरणाचे कोटयावधी फेरे चुकले. मला पांडुरंग भेटला व मी सहज सुखरुप पावलो.

नामदेवांच्या आत्मानंदाची, अनुभवाची पातळी अवर्णनीय आहे. आत्मानंद अनुभवताना नामदेवांच्या डोळयाचे पारणे फिटते आणि त्यांना सुखाचा शेजार घडतो. नामदेव हे केवळ आंर्तभक्त राहिले नसून ज्ञानी भक्त होते.

## समारोप:-

अंतरंगाला प्राधान्यदेणारी अभंग - वाङ्:मयाची एक नवी परंपरा नामदेवांपासून सुरु झाली त्यांची शब्दशैली आत्मप्रत्ययाने रसरसलेली आहे. नामदेवांच्या सगुण भक्तीने आत्मभाव जागृत झाला. आत्मज्ञानाने पोखरलेले नामदेव 'दास मी दुर्बल वैष्णवांचा ।' अशी अभिजात शालीनता व्यक्त करीत आहेत.

व्यवहारातील आपत्तीतून वाट काढणारे नामदेवांचे लौकीक व्यक्तिमत्व हे आत्मीक अगतिकतेतून आत्मज्ञानाप्रत पोचणा-या त्याच्या पारमार्थिक व्यक्तिमत्वास साधनभूत व साहाय्यकारी झाले आहे. विविध विरोधांशी झगडणारे हे समर्थ व्यक्तिमत्व जसे क्षीण झाले नाही, तसाच वैफल्यातून येणार 'सर्वतुच्छवाद' त्यास लवमात्रही स्पर्श करीत नाही. नामदेव सदैव सत्व—संपन्न व प्रसन्न निर्भर राहिले. कटूता किंवा परखडपणा या पासून नामदेवांची अभंगवाणी दूरच राहिली आहे. वारकरी संप्रदायात, वारकरी संप्रदायाच्या सर्वांगीण उन्नत्तीकरीता एवढया जाणिवेने व विविध अंगानी अतिशय परिश्रमपूर्वक प्रयत्न करणारी व्यक्ती नामदेवाशिवाय अन्य क्वचितच आढळेल.

## संत शिरोमणी नामदेव अल्पसा चरित्र परिचय

### नामदेवांचे आत्मचरित्र:-

नामदेवांनी आपला स्वत:च चरित्रपट चित्रित केला आहे. नामदेवांच्या अभंगाच्या गाथेत 'श्री नामदेव चरित्र'या मथळयाखाली जे अभंग आहे त्यात नामदेवांची आत्मचरित्र आहे.[१०] पुन्हा 'तीर्थावळी' नामक प्रकरणातील काही अभंगाचे स्वरुप, त्यांना नामदेवांचे आत्मचरित्र म्हणता येईल असे आहे. मराठी वाङ्:मयाच्या इतिहासात नामदेवांच्या या आत्मचरित्रात्मक अभंगांचे महत्व अपूर्व आहे. दहाव्या शतकापासून मराठी भाषेच्या परिसरात एकेक वाङ्:मय प्रकार वस्तीस येऊ लागला. त्यात आत्मचरित्र या वाङ्:मय प्रकाराची वसाहत प्रथम नामदेवांनी केली, आद्य आत्मचरित्रकार, या पदवीची माळ मराठीने त्यांना नकळत, त्यांच्या गळयात घातली.

या आत्मचरित्रात्मक अभंगातून नामदेवांच्या चरित्रांची जी स्थूलरुपरेषा. डोळयात भरते ती अशी -

हे शिंप्याचे कूळ नरसी ब्राह्मणीचा दामाशेट शिंपी आणि त्यांची पत्नी गोणाई यांचे आऊबाई नामक कन्या हे पहिले अपत्य आणि नवसाने झालेला नामदेव हे दुसरे अपत्य. शके ११९२ हा नामदेवांचा जन्म शक. नामदेवांनी आपले जन्म वृत्त दोन अभंगातून दोन भिन्न प्रकारे निवेदिलेले आहे. "प्रसवली माता मज मळमुत्री ।" हे एका अभंगातले निवेदन: आणि "नरसी ब्राह्मणीचा दामशेट शिंपी । केशिराजरुपी मग्न असे ॥ ग्रामाचे बाहिर देवालय मूर्तिचे तेथे भजन त्याचे एकनिष्ठ ॥ मूर्तीशी नैवेद्य दाविल्यावाचूनि । न करी भोजन दामा शेटी ॥ त्याचिये स्त्रियेचे नाम गोणाबाई । पोटी पुत्र नाही सेवाकरी ॥ देवाने दिधले शुक्तिकाकमळ । म्हणे उकलेल नवमे मासी ॥ भरता नवमास गरोदरी दिसे । शिंपी वाढतसे आपोआप ॥ शुक्ति उकलिता प्रकटले बाळ । गर्भ चिन्हे सकळ मावळली ॥ नामदेव नाम ठेविले घेतले । पान्हा तयेवेळी फुटलासे ॥" हे दूस-या अभंगातले निवेदन नामदेवांना अयोनिसंभव ठरविणा-या या अभंगात पुढे सांगितले आहे की, पाच वर्षाचा झाल्यावर तो रोज देवाला दुधाचा नैवेद्य नेऊ लागला. एके दिवशी नामदेवांच्या आग्रहावरुन देवाने नामदेवांनी दिलेला नैवेद्य प्राशन केला! दिवसेदिवस नामा थोर झाला. बाबाने योग्य समयी त्यांचा विवाह केला.( दुदैवाने त्यावेळी त्याला चोरीचा संग जडला. "ब्राह्मण कापडी गरीब साबडी । केली प्राणघडी बहुतांची ॥ असा त्यानी उच्छाद मांडला. त्याने एकटयाने चौ-यांशी राऊत मारले. थोरल्या विशाल घोंडीवर बसून तो अशा रितीने देश धडी करु लागला. हे दुष्ट कर्म करीत असताना एक नेम त्याने निष्ठेने पाळला. आवंढया नागनाथांच्या दर्शनाला जाण्याचा, एके दिवशी दोन प्रहरी नामदेव देवळात गेला असताना तेथे एका ब्राह्मणाने देवाला अभिषेक करुन नैवेद्य दाखविलेला होता. तेथेच एक अनाथ शुद्र स्त्री लहानग्या मुलाला कडेवर घेऊन उभी होती. ते नैवेद्याचे अन्न मिळावे म्हणून त्या बालकाच्या पोटातल्या भुकेने हट्ट घेतला. आईने त्याला खडसाविले. नामदेवांचे चित्त कळवळले. "वेडे बये,

मुलाला कशाला मारतेस? न मारु तर काय करु? चुलीत काय हाडे घालू? नामदेवांने चौ-याशी राऊत मारले त्यात माझा भ्रतार मेला." आपल्यामुळे ही स्त्री अनाथ झाली, आपल्यामुळे तिच्यावर दुर्दैवाचा हा असहय घाला पडला, या जाणीवेच्या विचाराने त्याचा सगळा जीव हिरवा निळा पडला. स्वप्नातील एखादया भयानक दृश्यानी जाग यावी तशी नामदेवाची अवस्था झाली. त्यांना अनुतापाचा अनावर उमाळा आला. दुष्ट कर्माच्या रखरखीत उन्हाचा जळजळीत चटका बसताच, त्यांचा जीवरुपी पक्षी अनुतापाच्या सावलीत येऊन विसावला, 'नको हे पापी, खुनी जिने' असे वाटण्या इतक्या उग्र शिगेला त्याचा अनुताप जावून पोहचला. महादेवाच्या पिंडीजवळच त्यांनी आपल्या डोक्यावर सुरीचा वार केला. नागनाथाला खुनाचा अभिषेक घडला तो प्रसन्न झाला. 'तू पंढरीला जा तेथे तूझा महिमा वाढेल' असा नागनाथाकडून आदेश मिळाला. 'माशांची घोंगांणी जनांची निंदणी' सहन करीत नामदेव पंढरीच्या दिशेने जावू लागले. विठ्ठलाने आपल्या भक्ताजवळ नामदेवासंबंधी धोक्याची सुचना दिली. "परम पातकी अघोर चांडाळ । त्याशी माझे जवळ आणू नका ।" देवाच्या पहिल्या झिडकारण्याबरोबर नाउमेद होण्याइतकी नामदेवाची निष्ठा कच्ची नव्हती. ती भक्कम होती त्यांनी देवाला पत्रपाठविले - " पतितपावन ब्रीद सोडविन आता । तरीच पंढरीनाथा दास तुझा ॥" नामदेवांच्या भक्तीतील अनन्य, अपरिमित आतूरता पंढरीनाथाला पटली,आणि पुढे लवकरच, "नामा तो केशव केशव तो नामा ।" अशा अभिन्नतेच्या कांतीने ईश्वर भक्तीतील परस्पर प्रीती झळकू लागली. नामदेवांचे वडील, आई, त्यांची पत्नी यांच्या प्रखर विरोधाचे प्रहार त्या प्रीतीच्या वेलीला सहन करावे लागले. पण त्या प्रहारांना दाद न देता, उलट त्यामुळे ती वेल अधिकच जोमाने फोफावली ! पुढे एकदा निवृत्ती ज्ञानदेवादी संताच्या मेळाव्यात गोरोबांनी जमलेल्या संतांच्या संतत्वाची कसोटी पाहण्याचे निमित्त होवून नामदेवास गुरुकृपेची महती कळली आणि मग "परेहूनि परते घर । तेथे राहू निरंतर ।" "बंधमोक्षांची फिटली काजळी । समाधि लागली समाधीसी ॥" अशा अलौकिक अनुभवांच्या समृध्दीने त्याची ईश्वर प्रीतीची वेल

गुरुकृपेने बहरुन निघाली. नामदेव पंढरपूरला आले तेव्हा त्यांचे वडीलही तेथेच येऊन निवासी झाले आणि [११]

गोणाई राजाई दोघी सासुसूना । दामा नामा जाणा बापलेक
नारा विठा गोंदा महादा चौघेपुत्र । जन्मले पवित्र त्यांच्या वंशी
लाडाई गोडाई येसा साखराई । चौघी सुना पाही नामयाच्या
लिंबाई ती लेकी आऊताई बहिणी । वेडी दासीजनी नामयाची

हे दासी जनीचाही समावेश झालेले नामदेवांचे एकूण पंधरा जणांचे कुटुंब विठ्ठलाच्या नाम गजरात पंढरपूरातच नांदले. कोणताही संसार उपयोगी, द्रव्योत्पादक, उदयोग करण्याविषयीची नामदेवांची संतापजनक उदासिनता पाहून, यापैकी काहींच्या मनात विठ्ठलाविषयी जो विरोध भाव उत्पन्न झाला होता. तो कालांतराने मावळला आणि त्यांच्याही मनात विठ्ठल भक्तिचा ओलावा निर्माण झाला.

एकदा नामदेवांबरोबर भूतळीची तीर्थे पहावी अशी आर्त ज्ञानराज ज्ञानदेवांच्या मनात निर्माण झाली. नामदेवांनी, विठ्ठलाच्या संमतीने, साद दिली. नामदेवांना जीवनमुक्त ज्ञानदेवांबरोबर उत्तरेकडील तिर्थक्षेत्रांची यात्रा घडली. नामदेवांच्याच एका अभंगातील "ऐंशी वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण ।" या ओळीत सुचविल्याप्रमाणे त्यांना ऐंशी वर्षे आयुमर्यादा लाभली. शके १२७२ मध्ये त्यांची प्राणज्योत विठ्ठल तत्वात विलिन झाली.

**ज्ञानेश्वरांची दोन जुनी चरित्रे:-**

ज्ञानेश्वरांची सविस्तर अगर संक्षिप्त चरित्रे गदय पदयात अनेकांनी गायली असली तरी त्या सर्वात दोन चरित्रे अधिक प्राचीन व अधिकृत पुरुषांनी लिहिली असल्यामुळे तिच प्रमाणभूत मानली पाहिजेत. त्यापैकी एक ज्ञानेश्वरांचे प्रशिष्य नामदेव यांचे व दुसरे त्यांचेच अनुग्रहीत सत्यामळनाथ यांचे. पहिले अभंग वृत्तात आहे तर दुसरे ओवीवृत्तात आहे. [१२]

नामदेवांनी ज्ञानेश्वरांवर 'आदि', 'समाधी' व 'तीर्थावळी' अशी तिन प्रकरणे लिहिली. 'आदि' प्रकरणाचे अभंग ३१ असून त्यात ज्ञानेश्वरांच्या

आई-वडीलांचा वृत्तांत दिला आहे. 'समाधी' प्रकरणाचे ७१ अभंग असून त्यात चारी भावंडे व चांगदेव या पंचायतनाच्या समाधीचे सविस्तर वर्णन आहे. 'तीर्थावळी' प्रकरणात ६२ अभंग असून त्यात नामदेव व ज्ञानदेव यांनी केलेल्या उत्तरेकडील यात्रेचे व मावंदयाचे वर्णन आहे.

वर्णने विस्तृत, रसभरित व अत्यंत मधुर आहेत. समाधीप्रकरणाच्या अभंगात नामदेवांशिवाय आणखी कोणाचातरी हात शिरला असावा. अशी कल्पना येते. कारण समाधि प्रकरणाची पुरवणी म्हणून नामदेवांची 'आळ, हट्ट' या नावाचे जे २४ अभंग आहेत त्यामध्ये या मंडळीनंतर २०० वर्षांनी झालेल्या भानुदास व कान्होपात्रा या भक्तांची नावे आली आहेत. तथापि आदि व तीर्थावळी या प्रसंगावरील अभंगतरी सर्व निःसंशय नामदेवांचेच दिसतात. ही वाणी साध्या कवीची नसून प्रेमळ व मुरलेल्या ज्ञानी भक्ताची आहे. त्यामध्ये पूर्ण प्रासाद आहे.

## संदर्भ टीपा


०१) स्मृतिस्थळ एक विवचन :- डॉ. वसंत रा. बोरगांवकर
नूतन प्रकाशन - पुणे - ३० पृ.क. ४५

०२) तत्रैव पृ.क. ४६

०३) तत्रैव पृ.क. ४१

०४) तत्रैव पृ.क. ४२

०५) श्री. ज्ञानेश्वर चरित्र - प्रा. माधव दामोदर अळतेकर.
'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६

०६) संत नामदेव - डॉ. हेमंत विष्णु इनामदार
केसरी प्रकाशन - पुणे - पृ.क. १३२

०७) तत्रैव पृ.क. १३५

०८) तत्रैव पृ.क. १३७

०९) तत्रैव पृ.क. १४७

१०) प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास - भाग पहिला उत्तरार्ध
डॉ. अच्युत नारायण देशपांडे व्हीनस प्रकाशन - पुणे पृ.क. ४

११) तत्रैव पृ.क. ६

१२) मराठी वाङ्:मयाचा इतिहास
लक्ष्मण रा. पांगारकर खंड - १ ला - पृ.क.३५२